# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०५/०२/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### पोलीस स्टेशन सावनेरची कार्यवाही

दिनांक ०३/०२/२०२२ रोजी सावनेर पोलीसंना गुप्त माहिती मिळाली की, कोदेगाव कडुन बोरूजवाडा कडे जाणाऱ्या रस्त्यावर काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन दिनांक ०३/०२/२०२२ चे १७.४५ वा. सुमारास बेरूजवाडा फाटा सावनेर येथे सावनेर पोलीस पथकाने तात्काळ नाकाबंदी केली असता १८.३० वा. सुमारास एकामागे एक असे चार पीकअप वाहने संशयित रित्या कोदेगाव कडुन बोरूजवाडा कडे येत असतांना बोरूजवाडा फाटा येथे येतांनी दिसले. सदर चारही बोलेरो पिकअप गाडी क्र. १) एम.एच.–४०/एके–४२३१ चा चालक आरोपी नामे– १. भषण मोरेश्वर राउत, वय २२ वर्ष, रा. मोहपा ता कळमेश्वर, २) एम.एच.–४०/बीजी–८२८४ चा चालक आरोपी नामे– सुरज शिवलाल शनेश्वर वय २२ वर्ष रा. मोहपा ता कळमेश्वर ३) एम.एच.–४०/बीजी–९६८१ चा चालक आरोपी नामे– योगेश साहेबराव उईके वय ३० रा. मोहपा ता कळमेश्वर व ४) एम.एच.–४०/सिडी–०६१५ चा चालक आरोपी नामे– ४. अशोक श्रीराम इरपाते वय ३० ता बुदला ता कळमेश्वर यांचे चारही वाहनात एकुण १६ नग (बैले) कि. ८०,०००/–रू. चे जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती २०,८०,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार दिनेश काकडे, पो.स्टे. सावनेर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास परि पोलीस उपनिरीक्षक श्री दिनेश खोटेले मो.क्र ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री मुख्त्यार बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सावनेरचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री मारूती मुळूक, परि पोलीस उपनिरीक्षक श्री दिनेश खोटेले, पोलीस हवालदार काकडे, रूडे, आशिष कारेमोरे, मपोहवा मनिषा बंडिवार, पोलीस नायक सोनेवाने, पोशि नागरगोजे, शास्त्री, अशोक निस्ताने, नितेश परखड यांनी यशस्वीरित्या पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर